

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-महाराष्ट्र राज्य.



संस्थापक-अध्यक्ष-श्री हरिभक्त मधुसूदन महाराज, भामचंद्र डोंगर, पो.वासुली, ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे

सत्यमेव जयते !

दिनांक: / /२०१

सन - २००८

प्रति,
संत परंपरा व प्राचीन संस्कृती अभिमानी

यांस सप्रेम जयहरि .....

महोदय,

लोकवस्तीतील देवालये, संत महात्म्यांची जन्मस्थळे, निवासस्थाने, समाधिस्थळे यांचा विकास करताना भव्यत्त्व व आकर्षकपणा डोळ्यासमोर ठेऊन विकास करणे योग्य आहे. परंतु एकांतातील गिरीस्थाने व तप:साधना भूमी ज्या संत महात्म्यांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या आहेत त्या भूमीचा विकास करताना तीचा महिमा (स्थायीभाव एकांत) लक्षात घेऊनच तद्-अनुकूल विकास करणे गरजेचे आहे.

कारण ज्या हेतूसाठी त्या संत महात्म्यांनी त्या एकांतात ध्यान-तपसाधना करुन विश्वाला शांतीचा संदेश व तत्वज्ञानाचा खजिना दिला. त्याच मार्गाने चालून उद्याचे संतमहात्म्ये उदयाला येण्यासाठी याच पवित्र भूमीचा उपयोग होणार असतो म्हणून अशा भूमीच्या विकासात तेथील शांतता भंग पावणार नाही व अखंडत्त्व आणि एकांत कायम राहील अशाप्रकारे त्या भूमिचे वस्तुसामर्थ्य ओळखून तसा विकास आराखडा असावा.

वरील सांगणे एवढ्यासाठीच की, देहु परिसरातील श्रीक्षेत्र भामचंद्र डोंगर व श्रीक्षेत्र भंडारा डोंगर ही संत तुकाराम महाराजांची तपोभूमी, साधनाभूमी आहे म्हणून या डोंगरांची नैसर्गिक ठेवण न बिघडता ते वृक्षराजीने नटवावेत, फार कृत्रीम बाग बगिच्यांची योजना असू नये. रस्ते व्यवस्थित व दोन्ही बाजूने संरक्षित कठडे असलेले असावेत मात्र हे रस्ते फार प्रशस्त असू नयेत, त्यामुळे अनावश्यक वर्दळ वाढते. स्वाभाविक पाऊलवाटा चांगल्याच. विद्युत पुरवठाही माफक असावा फार झगमगाट नको, पाणी मात्र पुरेसे व स्वच्छ असावे. तेथील वास्तू बांधकाम विकासासाठी होणारा कोट्यावधीचा खर्च डोंगरातील खाजगी जागेच्या संपादनासाठी करुन ते क्षेत्र शासनाद्वारे आरक्षित करावे. कारण वर्तमानातील एकांत व निसर्गाची दशा ध्यानी घेता भविष्यात अशा पवित्र जागेचा दुरुपयोग होऊन अतिक्रमणयुक्त अनाधीकृत बांधकामे व व्यवसाय उभे राहण्याची जास्त भीती आहे. या करिता ही डोंगर स्थाने सार्वजनिक मालकीची असावीत.

योगायोगाने श्रीक्षेत्र भंडारा व भामचंद्र हे डोंगर साधारणत: प्रत्येकी २५० ते २७५ हेक्टर क्षेत्राचे असून ८०% सरकारी मालकीचे आहेत. उर्वरीत २०% खाजगी मालकी असलेले शेतकरी आजपर्यंत येथे नैसर्गिक शेती करीत होते. मात्र आज सदर डोंगराचे पायथ्यापर्यंत एम.आय.डी.सी.आल्यामुळे या २०% जमिनी विकल्या जाऊन सदर ठिकाणी अनाधिकृत खाणकामे व बांधकामे सुरु आहेत. तेव्हा डोंगराचा नैसर्गिक ठेवा व अखंडत्त्व कायम राखण्यासाठी देहू तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात श्रीक्षेत्र भंडारा डोंगर व भामचंद्र डोंगर आरक्षणाची तरतूद करुन ही २०% खाजगी जागा त्वरीत संपादित व्हावी व ही डोंगर भूमी तटबंदीने संरक्षीत ठेवावी.

या पवित्र डोंगरातील फक्त २०% खाजगी मालकीचे जे क्षेत्र आहे ते धनधांडग्यांनी शेतकऱ्यांकडून पॉवर ऑफ ॲटर्नी ने कवडीमोल भावात विकत घेतले आहे. त्यावर अनाधीकृत खाणी, बांधकामे स्टॉल-मॉल, हॉटेल आदी धंदे उभे राहिल्यास या साधना व तपोभूमीचा एकांत व पावित्र्य नष्ट होईल. हा धोका ओळखून आजच हा पावन एकांत व रमनिय ठेवा आम्ही जतन केला नाही तर उद्याची पिढी आम्हाला माफ करणार नाही. जगत्गुरु संत तुकोबांच्या या ध्यान-चिंतन भूमीची अवहेलना व त्यांच्या अभंग तत्त्वज्ञानाची प्रतारणा आमचेकडून होऊ नये यासाठी छेडलेल्या आंदोलनात संघर्ष समिती आपल्या सहकार्याची अपेक्षा करीत आहे...

आपली
संतभूमीसाठी लढणारी
संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य

ॐमधुसूदन

संस्थापक अध्यक्ष - श्री. मधुसूदन महाराज पाटील

विभागीय कार्यालय :-
"संतभूमी संरक्षक संघर्ष समिती"
'सूर्यभानजी पिंपळे स्मृतीभवन', अलंकापुरीनगर,
आळंदी-देवाची, ता. खेड, जि. पुणे-४१२ १०५.